




साप्ताहिक

www.dongarcharaja.com

वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा

संपादक : अनिल वाघमारे








■ वर्ष ११ ■ अंक ३० ■ गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.


# ‘अभिमन्य’ चक्र भेदण्यात अयशस्वी ठरले....

## नगराध्यक्ष शेषेराव जगताप व भारत जगताप यांना पितृशोक



**वडवणी :प्रतिनिधी**

**वडवणी येथील नगराध्यक्ष शेषेराव बापु जगताप व राष्ट्रवादीचे नेते भारत दादा जगताप यांचे वडील माजी उपसरपंच तसेच सर्वपरिचीत व्यक्तीमत्त्व अभिमन्यू आण्णा जगताप यांचे काल दि.१५ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी उपचारादरम्यान दु:खद निधन झाले आहे. त्यांच्यावर मागील पाच दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र उपचारादरम्यान रात्री १०:१५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. सोमवारी वडवणी शहरातील वैकुंठधाम याठिकाणी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यात्रसंगी जिल्ह्यातील जगताप कुटुंबीयांचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक, शासकीय, वैद्यकीय, व्यावसायिक, न्याय व्यवस्था यांसह सर्वच क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून दिवंगत अभिमन्यू जगताप यांना श्रध्दांजली अर्पण केली.**

प्राण जाये पर वचन ना जाये अगदी याप्रमाणे जीवनभर सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात रुबाबदार व निर्भिडपणे आयुष्य जगणारे आणि शुन्यातून आजच्या मोठ्या विश्वाची निर्मिती करत आपल्या दोन्ही मुलांना आणि संपूर्ण कुटुंबाला व्यवसाय व राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात मोठ्या उंचीवर घेवून जाणारे धिरोदत्त अभिमन्यू आण्णा जगताप यांचे असे अकाली जाणे सर्वांच्याच मनाला चटका लावून गेले. बरोबर अठरा वर्षांपूर्वी भयंकर अपघातामध्ये मृत्यूलाही हरवून यमराजाला रिकाम्या हाताने परत पाठविणारे अभिमन्यू आण्णा हे या वेळचे अभिमन्यू चक्र भेदण्यात मात्र अयशस्वी ठरले. गेल्या महिन्यात राहत्या घरी पाय घसरुन पडल्याने त्यांच्या पायाला इजा झाली होती. त्याची शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण होवून त्यांना डिस्चार्ज ही देण्यात आला होता. मात्र पाच दिवसांपूर्वी परत एकदा ब्लड प्रेशर व अन्य शारिरीक त्रासांमूळे त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. दाखल केले तेंव्हापासूनच त्यांची तब्येत नाजूक अवस्थेत होती. मात्र दोन्ही चिरंजीव भारत जगताप व शेषेराव जगताप यांनी आणि रुग्णालयाच्या सर्व स्टाफ यांनी त्यांच्या तब्येतीत सुधारणा व्हावी यासाठी अपार मेहनत घेतली परंतू नियतीच्या मनात काहीतरी वेगळं होतं आणि काल दि.१५ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी उपचारादरम्यान रात्री १०:१५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. वडवणी परिसरात ही निधन वार्ता कळताच सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात होती. सोमवारी दुपारी १२ वाजता वडवणी शहरातील वैकुंठधाम याठिकाणी अतिशय जड अंत:करणाने व साश्रू नयनांनी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी जिल्ह्यातील जगताप कुटुंबीयांचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक, पत्रकारिता, शासकीय, वैद्यकीय, व्यावसायिक, न्याय व्यवस्था यांसह सर्वच क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून दिवंगत अभिमन्यू जगताप यांना श्रध्दांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात कुटुंबामध्ये दोन मुले राष्ट्रवादीचे नेते भारत जगताप व नगराध्यक्ष शेषेराव जगताप, एक मुलगी, जावाई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. जगताप परिवाराच्या दु:खात डोंगरचा राजा परिवार सहभागी आहे.





## बाप गेल्यावरच दु:खाची खरी जाणीव होते

तो असताना कधी त्याची किंमत कळलीच नाही. तो शांतपणे आमच्या आयुष्याचा आधार बनून उभा होता. कधी स्वत:साठी काही मागितलं नाही, पण आमच्या प्रत्येक स्वप्नासाठी मात्र झटलाच. स्वाभिमान आणि निडरपणा त्यांनी आम्हाला शिकवला.. आयुष्यभर ते लोकांच्या मदतीसाठी धावून गेले. कोणावर अन्याय झाला, तर अन्यायाविरुद्ध उभं राहणं हीच त्यांची खरी ओळख होती. बाप गेल्यावर कळतं.घरातली ती मजबूत भिंत कोसळली आहे,डोक्यावरचं छत्र हरपलं आहे...

आजही अनेकदा प्रश्न पडतो

‘‘आता आमच्या पाठीशी आधार होऊ उभं कोण राहील?’’तो रागावायचा, ओरडायचा, शिस्त लावायचा.पण त्या प्रत्येक शब्दामागे अपार प्रेम होतं. आज ते शब्द आठवले तरी डोळे भरून येतात. ते कधीही स्वत:पुरते जगले नाहीत,नेहमी समाजासाठी, माणसांसाठी जगले.माणूसकी आणि पुण्याई हीच त्यांच्या आयुष्यातील खरी कमाई होती.. आज ते आमच्यात नसले,तरी त्यांचे संस्कार, विचार आणि दिलेला आत्मविश्वास नेहमी आमच्या पाठीशी उभा आहे. बाप म्हणजे देवाचच दुसरं रूप असतो तो गेल्यावरच त्याची खरी किंमत कळते..

भावपूर्ण श्रद्धांजली
तुमची आठवण कायम राहील.

**: नगराध्यक्ष शेषेराव जगताप**









## संपादकीय

# महायश

लोकसभा, विधानसभा, नगरपालिका, नगरपरिषदा आणि महापालिकांच्या निवडणुकांतील यशानंतर भाजपप्रणीत महायुतीने आता महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांसाठी झालेल्या निवडणुकांतही बाजी मारली. भाजप हाच एक नंबरचा पक्ष ठरला असून, त्यानंतर शिवसेना, मग अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असा क्रम राहिला. विरोधी आघाडीतील पक्षांमध्ये काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या असून, त्यानंतर ठाकरे सेना व नंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा नंबर लागला. एकेकाळी काँग्रेस आणि राष्ट्रवादीची असलेली सत्तास्थाने महायुतीने काबीज केली असून, त्यातही भाजपने मुसंडी मारली. विशेषत:, ग्रामीण आणि प्रादेशिक राजकारणात भाजपने मिळवलेले हे यश पक्षाच्या सूत्रबद्ध आणि पर्यायी राजकीय मांडणीचे आहे. विशेषत:, विकासाचे राजकारण आणि मतदाराला ट्रिपल इंजिन सरकारची दिलेली ग्वाही, लाडकी बहीण यासारख्या लोकानुनयी योजनांची अंमलबजावणी याचा या निवडणुकीतही प्रभाव पडल्याचे दिसले.

कोकणात रायगडला शिवसेना (शिंदे), भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) ची कामगिरी दमदार ठरली. रत्नागिरीत शिंदे शिवसेनेला, तर सिंधुदुर्गात भाजपला मोठे यश मिळाले. मराठवाड्यातील लातूर जिल्हा परिषदेत काँग्रेसला चांगले यश मिळाले. मनसेने अनपेक्षितपणे तीन जागांवर विजय प्राप्त केला. या निकालांमुळे मराठवाड्यातील राजकारणात मनसेचा प्रवेश झाला असला, तरी राज्यात बाकी कुठेही या पक्षाचा फारसा मागमूसही दिसून येत नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक मतदान पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे या निवडणुकीत किती टक्के मतदान होते, याकडे लक्ष लागून राहिले होते. परंतु, १२ जिल्ह्यांमध्ये सरासरी ६८ टक्के मतदानाची नोंद झाली. जवळपास तीन जिल्ह्यांत ७० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले. सर्वात कमी ५५.७९ टक्के रत्नागिरी जिल्ह्यात झाले, तर त्यापेक्षाही कमी ५४.९० टक्के बारामतीत झाले. या निवडणुका स्थानिक स्तरावरील असून, त्या कार्यकर्त्यांच्या असतात, असे मानले जाते.

जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या या मोठ्या प्रमाणावर राज्य सरकारवर अवलंबून असतात. त्यामुळे जो पक्ष सत्तेत, त्याच्या बाजूने मतदारांचा कल असतो. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस यांचे लोकशाही आघाडी सरकार असताना, या संस्थांमधील निवडणुकांत त्यांना यश मिळत होते. २०१४ मध्ये महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप-शिवसेना युतीचे सरकार आले. त्यावेळी, फडणवीस यांचे नेतृत्व नवखे असून ते शहरी आहे, त्यांना राज्यात कोणी ओळखत नाही, अशी टीका विरोधकांनी केली होती. प्रत्यक्षात त्यानंतर झालेल्या ग्रामपंचायती व जिल्हा परिषदांच्या निवडणुकांत फडणवीस यांनी कमाल करून दाखवली. आता तर केंद्रात, राज्यात आणि महापालिकांमध्ये महायुतीची, म्हणजेच ट्रिपल इंजिनची सत्ता असून, त्यामुळे एकापाठोपाठ एक विजय मिळताना दिसत आहे. भाजपने विजयातील सातत्य टिकवून धरलेले आहे. सोलापूर महापालिकेपाठोपाठ जिल्हा परिषदेवरही भाजपने झेंडा फडकावला.कोल्हापूरचा पहिला महापौर केलाच, जिल्हा परिषदही महायुतीकडे गेली. या बदलांची नोंद घ्यावी लागेल. अजित पवारांच्या निधनामुळे या निवडणुकांवर दुःखाचे सावट होते. त्यांच्या निधनापूर्वी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ताकदीने प्रचार केला. खुद्द अजित पवार हे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांतील पराभवांमुळे निकालांनंतर दुसर्या दिवसापासूनच अक्षरशः झपाटल्यासारखे काम करत होते. त्यांच्या निधनानंतर सहानुभूतीची लाट उसळली. त्यांच्या कामाचा झपाटा, त्यांची प्रशासकीय कार्यक्षमता आणि लोकाभिमुख कारभार हे गुण आठवून राष्ट्रवादी काँग्रेसला लोकांनी भरभरून मतदान केले. त्यामुळे या पक्षाने या निवडणुकांत खूप वरचे स्थान प्राप्त केले आहे. पुणे जिल्हा परिषद निवडणुकीत तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीने एकहाती सत्ता मिळवून दादांचे स्वप्न पुरे केले. पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादीचे सर्वाधिक आमदार असून, याचा या निवडणुकीत फायदा झाल्याचे दिसते. पुणे जिल्ह्यात भाजपला मात्र फटका बसला असून, महापालिकेतील यशाच्या पार्श्वभूमीवर हा पराभव धक्कादायक मानावा लागेल. पुणे, सातारा, रायगडमध्ये हा प्रभाव ठळकपणे दिसला.सांगलीत राष्ट्रवादी शरद पवार गट सर्वात मोठा पक्ष ठरला. ही जिल्हा परिषद त्रिशंकू स्थितीत पोहोचली आहे. राज्यात अन्यत्र मात्र शरद पवार राष्ट्रवादीला फारसे यश मिळवता आले नाही. सातार्यात २०१७ साली झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत एकूण ६४ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसने तब्बल ३९ जागांवर विजय मिळवला होता. मात्र, यावेळी सातारा जिल्ह्यातही भाजपने लक्षणीय यश मिळवले. कोल्हापुरात काँग्रेस आणि राष्ट्रवादीला उल्लेखनीय यश मिळाले आहे. मात्र, स्वतंत्रपणे लढलेल्या महायुतीतील पक्षांच्या यशस्वी उमेदवारांची संख्या जास्त असून, त्यामुळे ते सहजपणे सत्ता स्थापन करतील, असे चित्र आहे. मंत्री उदय सामंत, नितेश राणे, भरत गोगावले आदी अनेक मंत्र्यांनी ठसा उमटवला. या निवडणुकांमधून महाविकास आघाडीची झालेली दुर्दशा पाहायला मिळाली.

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार बीड यांचे न्यायालयात**

जन्म नोंद दावा प्रकरण ७२९/२०२५

मोती युसूफ सय्यद विरुद्ध ग्रा.पं. कार्या. परभणी (के)

पहा

१.मोती युसूफ सय्यद, रा.परभणी (के.) ता.जि.बीड. उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक यकीन मोती सय्यद यांचा दिनांक ३०/०१/१९६७ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहूण अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास परभणी (के.) ता.बीड येथील जन्म मृत्यूर रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहून जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे परभणी (के) ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ९/२/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ९/३/२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**

**तहसिलदार, बीड**

# बुद्धगया दर्शन धम्म सहल प्रवास वर्णन

## माजी केंद्रीय मुख्याध्यापक श्रीराम वाघमारे गुरुजी यांच्याच शब्दात

भाग:८





ते निघून जाणार पण रामजी बाबाची भेट झाली त्यांनी वापस येण्याबद्दल फारच मनधरणी केली. पण त्यांनी ते मान्य केले नाही. त्या पुढील काळात भिमाबाई गरोदर राहिल्या. नऊ महिने नऊ दिवस झाल्यानंतर १९८२ इ.स.ला डॉक्टर बाबासाहेबाला भिमाईच्या उदरी जन्म झाला. तिथे बाबासाहेब शाळेत जाण्याजोगे झाले आणि शाळेत शिक्षण घेऊ लागले. ते पुढे चालून बरेच शिक्षण घेऊन मोठे विद्वान झाले. भारत सरकारने बाबासाहेब जन्मले त्या ठिकाणची कॉलनी तोडून मोठे तीन मजली स्तुपाची निर्मिती केली आहे. त्या विहाराचे उद्घाटन १४ एप्रिल २००८ ला झाले आहे.

अजिंठा - अजिंठा व वेरूळ या लेण्या सातवाहन राजाच्या काळात तयार झाल्या असे सांगतात. पुढे चालून त्या लेण्या बुजून गेल्या होत्या. पण इंग्रजांच्या काळात एका इंग्रज अधिकाऱ्याने त्याचे खोदकाम करून पूर्ण विकसित केल्या. तिथे ३२ लेण्या सध्या पहावयास मिळतात. जपान सरकारने त्या लेण्याची दुरुस्ती करण्यासाठी पाच कोटी रुपये खर्च करून अजिंठा येथील लेण्याचा विकास केला.घाटाच्या खाली मोठे गार्डन बनवले आहे. तिथे गाड्या लावण्यासाठी पार्किंग व्यवस्था देखील केली आहे. आपली गाडी तिथे पार्किंगला लावून तेथील गाडीने चार किलोमीटर आत जावे लागते.नंतर लेण्या पहावयास मिळतात. डोंगर कोरून दोन दोन मजली इमारती खडक करून तयार केलेले आहेत. त्या लेण्याच्या खालच्या डोंगराचा भाग कडा असून फारच कठीण आहे. पूर्वी तेथे जाणे फारच त्रासाचे होते. पण आता पर्यटकास पाहण्यास फारच सुलभ झाले आहे.क्रमश :

# शाळेच्या आठवणीच आयुष्यातील आनंदाचे खरे गमक:डॉ.शंकर वाघ

## शाहू विद्यालयातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



वडवणी: वडवणी येथील छत्रपती राजर्षी शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ भावनिक वातावरणात पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सानप बी.व्ही. तर प्रमुख पाहूणे म्हणून वडवणी येथील नामांकित वैद्यकीय तज्ञ डॉ.शंकर वाघ, अक्षय काळे, शिंदे बी.ए. व जाधव ओ.एम. हे उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते आरक्षणाचे जनक छत्रपती राजर्षी शाहू महाराज व पहिल्या स्त्री शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कु.आरोही गाडे हीने स्वागत गिताने मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी एक कार्यालयीन कपाट विद्यालयाला भेट दिले. यानंतर काही विद्यार्थ्यांनी विद्यालयातील अविस्मरणीय आठवणींना उजाळा दिला व आपल्या विद्यालयाप्रती, शिक्षकांप्रती असणाऱ्या भावना व्यक्त केल्या. यावेळी सर्व वातावरण भावनिक झाले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ.शंकर वाघ यांनी परीक्षेसंबंधी सुचना व शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेच्या गोड आठवणीचं आयुष्यातील आनंदाचे खरे गमक असते. हे येथून बाहेर पडल्यानंतर आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर जाणवते. भविष्यात तुम्ही आई-वडीलांचे व विद्यालयाचे नाव कमवाल अशा अपेक्षाही व्यक्त केली. त्याचबरोबर अक्षय काळे यांनी आपण आपल्या आई-वडीलांच्या कष्टाची जाणीव ठेवून भविष्याकडे वाटचाल करावी व आपले ध्येय साध्य करावे असे मार्गदर्शन करुन परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वडमारे सर यांनी केले तर सुत्रसंचालन महानवर सर यांनी केले व शेवटी सर्व उपस्थितांचे आभार सरवदे मॅडम यांनी मानले.



बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे संत डॉ. रामराव महाराज यांच्या समाधीस्थळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भक्तिभावाने दर्शन घेतले. यावेळी ना. संजय राठोड, महंत संजय महाराज, सुंदरसिंग महाराज, मनीष महाराज, शंकरगिरी महाराज, विष्णू राठोड, बराकर आडे, सुभाष राठोड बीड आदी मान्यवर उपस्थित होते.



राजा हरिश्चंद्र पिपंरी देवस्थान चे हभप भगवान महाराज राजपूत यांचा यथोचित सत्कार करताना युवा नेते अशोक गोंडे दिसत आहेत.

# डॉ.प्रितमताई मुंडे यांचा वाढदिवस साजरा

बीड : प्रतिनिधी

परमेश्वराने जे जिवन आपल्याला दिले ते आनंदाने व निर्व्यसनी पणे जगा व्यसनाच्या आहारी जाऊ नका असे उद्गार अखंडानंदगिरी महाराज यांनी केले. निमित्त होते बीड जिल्ह्याच्या दबंग माझी खासदार डॉ प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते गोपिनाथराव मुंडे वृद्धाश्रम घाटसावळी व जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र घाटसावळी येथे विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी भवानी गडाचे मठाधिपती अखंडानंदगिरी महाराज यांच्या हस्ते आश्रमातील २५ आजी ,आजोबा यांना कपडे आणि साड्या वाटप व जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र घाटसावळी येथे उपचार घेत असलेल्या रुग्णांना मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव फड हे होते त्यांच्या समवेत भाजपा नेते चंद्रकांत फड, ज्येष्ठ नेते भगीरथ आबा बांडे, पंजाबराव काकडे,भाजपा ता. सरचिटणीस ,उपाध्यक्ष ,नितीन नवनाथराव खाडे ,राहुल आठवले, गजानन इंगोले आदी प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रकांत फड यांनी केले.

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०२/२०२६

अर्जदाराचे नाव - श्री. बळीराम ज्ञानोबा टकले

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- १) श्रीमती. सुमन सुखदेव टकले २) श्रीमती. संगिता सखाराम टकले ३) श्री. नरेंद्र सखाराम टकले

प्रकरण : नाव नोंदणी बाबत सिटी सर्वे नं. ३७४ मिळकत क्र.४५/१ वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) सामाईक क्षेत्र ३१२.९० चौ.मी.

पुर्व - पि.टी.आर.प्रमाणे, पश्चिम - पि.टी.आर.प्रमाणे

दक्षिण - पि.टी.आर.प्रमाणे, उत्तर - पि.टी. आर. प्रमाणे

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**

**नगरपंचायत, वडवणी**

## हजरत मन्सूर शाहवली उर्दू प्राइमरी स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन



वडवणी :प्रतिनिधी

वडवणी शहरातील हजरत मन्सूर शाह वली ( र. ह ) उर्दू प्राइमरी स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त प्रमुख उपस्थित संस्थेचे सचिव अस्लम अन्वरी, मुख्यध्यापक असेफ खतीब सर तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष हाजी शेख शरीफ, नगरसेवक मेहताब अब्दूर रौफ पठाण,नगरसेवक अस्लम कुरेशी,कामगार संघटनेचे वडवणी तालुका अध्यक्ष अन्वर पठाण, खालील पठाण,जावेद पठाण, सय्यद नसीर,इम्रान फिटर,शेख सोहेल, शेख फरोख, सय्यद रियाज, तज्जू पठाण,शेख मुस्तकिम तसेच कार्यक्रम यशस्वी करण्या साठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका यांनी भरपूर पर्यंत केले कार्यक्रमाला पालकांची व वडवणी शहरातील नागरिकांची लक्षणीय लक्षणीय होती. या कार्यक्रमाचे नियोजन अन्वर पठाण व मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०२/२०२६

अर्जदाराचे नाव श्रीमती. सुमैया बेगम अनवर पठाण

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. शेख जब्बार ईब्राहीम

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.६६० मिळकत क्र.१३२६ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम २५ फुट दक्षिणोत्तर ४० फुट एकुण क्षेत्रफळ ९२.९३ चौ.मी.

पुर्व - झाडे, पश्चिम - १५ फुट रस्ता

दक्षिण - पाटोळे यांचा प्लॉट,उत्तर - १० फुट रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०२/२०२६

अर्जदाराचे नाव श्री. शिवराज मुकुंद झाटे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- १) श्री. राजमल पन्नालाल नहार २) श्री. सिध्देश्वर गंगाधरराव लंगे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४२३ प्लॉट क्र.०६ वडवणी येथील आहे.सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम १३.५० मीटर दक्षिणोत्तर ०८ मीटर एकुण क्षेत्रफळ १०८ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र. ०२, पश्चिम - ०९ मीटरचा रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र.०७, उत्तर - प्लॉट क्र. ०५

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०२/२०२६

अर्जदाराचे नाव - श्री. अमोल रामकिसन कदम

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. चंद्रकांत दिगांबर जैन (जगजीवन) प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. २२१ प्लॉट क्र. ०३ वडवणी येथील आहे.सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम दक्षिण बाजू १५.४० मीटर उत्तर बाजू १३.९० मीटर दक्षिणोत्तर पूर्व बाजू ०९.१५ मीटर पश्चिम बाजू ०९.०० मीटर एकुण क्षेत्रफळ १३०.८८ चौ.मी.

पुर्व - राऊत, पश्चिम - ०९ मीटर रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र.०४,उत्तर - प्लॉट क्र.०२

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०२/२०२६

अर्जदाराचे नाव श्री. शाहानुर मुसा कुरेशी

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. मोमीन असरार रियाज

प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र.११५८ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ३० फुट दक्षिणोत्तर ४० फुट एकुण क्षेत्रफळ १११ चौ.मी.

पुर्व - जलील अन्सारी,पश्चिम - गार्डी

दक्षिण - १५ फुट रस्ता, उत्तर - बागवान

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**

**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०२/२०२६

अर्जदाराचे नाव - श्रीमती. सत्यभामा लिंबाजी आंधळे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. चंद्रकांत दिगांबर जैन (जगजीवन)

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. २२१ प्लॉट क्र.१७ वडवणी येथील आहे.सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ०८.७५ मी. दक्षिणोत्तर १२.५० मी. एकुण क्षेत्रफळ १०९.३७ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र.१८, पश्चिम - ओपन स्पेस

दक्षिण - ०९ मीटर रस्ता, उत्तर - प्लॉट क्र. २५ व २६

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०२/२०२६

अर्जदाराचे नाव श्री. रेवणनाथ शिवाजी घुगे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. हनुमंत नारायण राऊत

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.२२० मिळकत क्र. २१७२/१० वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ३५ फुट दक्षिणोत्तर ३३ फुट एकुण क्षेत्रफळ १०७.३४ चौ.मी.

पुर्व - अशोक सदाशिव मुंडे यांचा प्लॉट,पश्चिम - २० फुटाचा रस्ता

दक्षिण - आंधळे यांचा प्लॉट, उत्तर - गोविंद बाबरे यांचा प्लॉट

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी २०२६ । पान ३

### लोणगाव येथील ग्रामस्थांनी केला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

माजलगाव:तालुक्यातील लोणगाव येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके साहेब यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश केला.लोणगाव येथील बालासाहेब फपाळ,प्रकाश कोळसे,बंडू कोळसे, सूर्यकांत सोनकांबळे,रमेश सोनकांबळे, बापू कोळसे,लक्ष्मण जाधव,बाबुराव कोळसे,अंगद आलाट,मुंजा कोळसे,बापू राऊत,उद्धव कोळसे,बाबासाहेब कोळसे, बाबुराव मायकर,नामदेव सोनकांबळे आणि गजानन सोळंके आदी ग्रामस्थांनी आज दि १५ रविवार रोजी रा.काँ.पक्षात माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके साहेब यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश केला. यावेळी कृ.उ.बा.स.माजी सभापती संभाजी शेजूळ,संचालक डॉ.उद्धव नाईकनवरे,माजी सभापती कल्याण अबुज,भोसले व इतर उपस्थित होते.

# राजा हरिश्चंद्र संस्थानला आ.प्रकाश सोळंके यांच्याकडून पंधरा लाखांचा निधी


## हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

वडवणी:प्रतिनिधी

देवांचे आणि संतांचे मंदिरे ही आपल्याला जीवनाची पायवाट दाखवत असतात. त्यामुळे आपल्या भागातील सर्व देवतांचे आणि संत महंतांचे मंदिरे यांचे जतन करणे हे आपलं कर्तव्य आहे.यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा.विश्व मित्र मंदिरासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी १५ लक्ष रुपयाचा निधी मंजूर केला असल्याचे जयसिंह भैया सोळुंके यांनी जाहीर केले असल्याचे महंत भगवान बाबा रजपूत यांनी सांगितले.







जगभरातील एकमेव राजा हरिश्चंद्र चे मंदिर असलेल्या राजा हरिश्चंद्र पिंपरी येथील महाशिवरात्र महोत्सवाची सांगता या तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. कीर्तनासाठी बीड जिल्ह्यासह राज्यभरातून लाखो भाविक माता भगिनी उपस्थित होत्या.महंत राजपूत महाराजांनी सांगितले की भारत देशाला खूप मोठा इतिहास आहे. देव देवतांचे संत महानतांचे या देशावर खूप मोठे उपकार आहेत.या देशाला खूप मोठी संस्कृती लाभलेली आहे.खूप मोठा विचारांचा ठेवा मानवांसाठी या महापुरुषांनी करून ठेवला आहे.या सर्व सत्पुरुषांची मंदिरे आता देशात आहेत या सर्व मंदिरांचं संगोपन होणे आवश्यक आहे. कारण ही मंदिरे आपल्याला आणि इथून पुढे जन्म घेणाऱ्या पिढ्यांना जीवनाचा मार्ग दाखवणार आहेत . या मंदिरातून कल्याण कारी मार्ग मानवांना दिसणार आहे. आपल्या भागात कितीही मोठा माणूस असला तरी त्याचं महत्त्व आपल्याला वाटत नाही.त्याच्या चांगल्या कार्याचा देखील आपण गौरव करत नाही.मात्र तो माणूस मेल्यानंतर त्याच्या नावाने मोठे मोठे बॅनर लावले जातात.त्याच्या आठवणी काढल्या जातात.जिवंत असेपर्यंत त्या माणसाची कदर करा त्याला मानसन्मान द्या. संत ज्ञानदेव,संत तुकाराम,संत भगवान बाबा,संत भीमसिंह बाबा यासह अनेक सतपुरुषांना जिवंतपणे समाजाने प्रेमापेक्षा यातनाच जास्त दिल्या.राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्र या ठिकाणीच ऋषी विश्वामित्र यांच्या मागणीवरून राजा हरिश्चंद्र आणि आपला राज्य स्वप्नात दान दिलं होतं या ठिकाणी संत भगवान बाबा भिमसिंह बाबा यांच्या माध्यमातून महाशिवरात्र महोत्सव संपन्न झाले अशा पवित्र भूमीत जन्म घेणाऱ्या प्रत्येक नागरिकांनी स्वतःला धन्यवाद पाहिजे असेही ते म्हणाले. कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून आलेल्या भाविक दाखल झाले होते. कीर्तन महोत्सवाची सांगता आनंदाच्या वातावरणात पार पडली. यावेळी जिल्ह्यातील हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा व दर्शनाचा लाभ घेतला.

आमदार प्रकाश दादा च्या वतीने पंधरा लक्ष रु निधी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर ऋषी विश्वामित्र यांचे भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिराच्या समोर उभारण्यात येणाऱ्या भव्य सभामंडपासाठी आमदार प्रकाश सोळंके यांच्या आमदार फंडातून १५ लक्ष रुपयांचा निधी या भागाचे युवा नेते जयसिंग भैया सोळंके यांनी जाहीर केला आहे. पुढील महिन्यात सभामंडपाचे काम सुरू होईल, असे असे भगवान महाराज राजपुत यांनी सांगितले.

## बाबुराव पोटभरे यांनी वाव्हळे कुटुंबियाची सांत्वनपर भेट घेऊन केली आर्थिक मदत

माजलगाव :रविंद्र राऊत

बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांनी वाव्हळे कुटुंबियाची आज दि.१५ रविवार रोजी दुपारी २ वाजता मांडेखेल ता.परळी वै.जि.बीड येथे सांत्वनपर भेट घेऊन आर्थिक मदत केली.

मांडेखेल येथील ऊसतोड मजुराचा मुलगा पोलीस बनायचं स्वप्न उराशी बाळगून पोलीस भरती करत असतांना मृत्यूमुखी पडलेल्या दिपक वाव्हळे हा गतप्राण झाला.त्याचे कुटुंबाची भेट घेतली आणि सांत्वन करून २००००/-(वीस हजार)रु.आर्थिक मदत केली. तसेच मा.ना.मंत्री संजयजी सिरसाट आणि मा.आमदार धनंजयजी मुंडे (मा.मंत्री) यांच्या सोबत बोलण करून हवी ती मदत पुरवण्याची ग्वाही दिली.यावेळी



उपसभापती मा. श्रीहरीनाना मोरे,जेष्ठ नेते मा. नवनाथअण्णा धाईजे, नगरसेवक सचिनजावळे, बाबा शेख, बबलू साळवे (परळी),यशपाल बनसोडे (परळी)आणि वाव्हळे कुटुंबिय आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## भगवान महाराज राजपूत यांच्या कीर्तनाने सांगता

वडवणी : प्रतिनिधी

भारतातील एकमेव राजा हरिश्चंद्र राजाचे मंदिर बीड जिल्ह्यात वडवणी तालुक्यातील हा पिंपरी येथे आहे. येथे महाशिवरात्री निमित्त बीड जिल्ह्यातील हजारो भाविक भक्तांनी राजा हरिश्चंद्राचे दर्शन घेतले.आज सोमवार दि १६ रोजी किर्तन महोत्सवाची राजा हरिश्चंद्र राजाचे मठाधिपदी श्री ह भ प भगवान महाराज राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे.

सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील हरिश्चंद्र पिंपरी येथे सत्यवादी राजा हरिश्चंद्र राजाचे एकमेव मंदिर या ठिकाणी आहे.येथे विश्व मित्रांनी राजा हरिश्चंद्र राजाला स्वप्नात राज्य दान मागितले होते.व राजा हरिश्चंद्राने स्वप्नात दिलेले राज्य दान दिलेली भूमी आहे.भारतातील एकमेव राजा हरिश्चंद्र राजाचे मंदिर याच ठिकाणी आहे.येथे महाशिवरात्रीनिमित्त बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील हजारो भावी भक्तांनी राजा हरिश्चंद्र राजाच्या रांगेत दर्शन घेतले.या ठिकाणी ग्रामस्थांकडून उपवास फराळाचे अन्नदान मोठ्या प्रमाणात आले होते,पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी लाभ घेतला.गेली आठ दिवस झाले महाशिवरात्री निमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये नामांकित कीर्तनकारांनी आपली हजेरी लावली होती. या महोत्सवात धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कीर्तन महोत्सवाची सांगता राजा हरिश्चंद्र मठाचे मठाधिपती श्री ह भ प भगवान महाराज राजपूत यांच्या काल्याचे किर्तन आणि होणार आहे. तरी या कीर्तनाचा व महाप्रसादाचा भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन राजा हरिश्चंद्र पठाचे मठाधिपती श्री हरिभक्त परायण महाराज राजपूती यांनी केले आहे.



## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात बाहेगव्हाण शाळा प्रथम

### जिल्हा परिषद व खाजगीच्या तीन शाळांना पारितोषिक

वडवणी:प्रतिनिधी

शासन निर्देशाप्रमाणे वडवणी तालुक्यात राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्रमांक ३ अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाहेगव्हाण या शाळेने वडवणी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या अभियानात वडवणी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद व खाजगी शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. काटेकोर मूल्यमापन प्रक्रियेनंतर बाहेगव्हाण शाळेची निवड प्रथम क्रमांकासाठी करण्यात आली.



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाअंतर्गत वडवणी तालुक्यातून जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या तीन शाळा व खाजगी व्यवस्थापनाच्या तीन शाळा यांची प्रत्येकी प्रथम, व्दितीय व तृतीय अशा स्वरुपात निवड करण्यात आली आहे. वडवणी तालुकास्तरीय निकालांमध्ये जिल्हा परिषद शाळांमधून प्रथम क्रमांक हा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाहेगव्हाण, व्दितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवडगाव बु., तृतीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गहिनीनाथ नगर यांनी पटकावला आहे. तर खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधून प्रथम क्रमांक अशोक माध्यमिक विद्यालय, चिंचाळा, व्दितीय क्रमांक उपळी हायस्कूल, उपळी तर तृतीय क्रमांक भगवानबाबा माध्यमिक विद्यालय, चिंचवण यांनी पटकावला आहे. दरम्यान बाहेगव्हाण शाळेला प्रथम क्रमांक मिळाल्यामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शाळेच्या सर्व शिक्षकांनी शाळेच्या सुशोभीकरण, स्वच्छता, हरित परिसर, आकर्षक भिंतचित्रे, विविध शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थी सहभाग या सर्व बाबींमध्ये सातत्याने नियोजनबध्द परिश्रम घेतले. या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख गणेश धाईतिडक, बडदे मॅडम, तारळकर मॅडम, सौंदरमल मॅडम, भस्करे सर, भुते सर, मुंडे सर यांचे योगदान लाभले. त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे व संघभावनेमुळे शाळेने हे उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच या संपूर्ण अभियानात तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांचेही मार्गदर्शन अत्यंत मौलिक ठरले. त्यांच्या सूचनांमुळे व प्रेरणेमुळे शाळेला योग्य दिशा मिळाली आणि दर्जेदार काम साकार झाले.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुंजाबा डांबे व सर्व सदस्य तसेच गावातील शिक्षणप्रेमी नागरिकांनी शिक्षकांचे अभिनंदन केले. गावकऱ्यांनी शाळेच्या प्रगतीबध्दल समाधान व्यक्त करत पुढील उपक्रमांसाठीही संपूर्ण सहकार्य देण्याचा विश्वास दिला. मुख्याध्यापकांनी शिक्षकवृंद, पालक, शालेय व्यवस्थापन समिती आणि गावकऱ्यांच्या सहकार्याबध्दल कृतज्ञता व्यक्त करत, हे यश संपूर्ण गावाचे आहे. आगामी काळातही शाळेला अधिक गुणवत्तापूर्ण व आदर्श शाळा बनविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करु असे सांगितले.


## विभागीय वन अधिकारी,बीड यांचे कार्यालय

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

खासबाग लेंडी रोड, बीड-४३११२२
Email-ID: dobeed1 @gmail.com

पुण्यश्लोक 300

### ई निविदा सूचना क्र.०३/२०२५-२०२६

विभागीय वन अधिकारी, बीड वनविभाग, बीड यांचे वतीने धारुर वन परिक्षेत्रातील खालील कामांसाठी खुल्या प्रवर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्या मधील कामाचा तपशील खालील प्रमाणे.

| निविदा क्र. | कामाचे ठिकाण | कामाचे नांव | वन परिक्षेत्र | प्रत्यक्ष कामाची अंदाजपत्रकिय रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये (१%) | काम करण्याची कालमर्यादा | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत रुपये | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3. | मौजे सोनिमोहा येथील रोपवल भाग-१ फॉ.स.नं.२९ क्षेत्र २५ हे.ता.धारुर जि.बीड | providing and erecting 1.65 mr high chainlink fencing with main gate& wicket gate to plantation (part-1 25 ha. area) at sonimoha in F.C. No.411A in F.survey No.29 in sonimoha beat in dharur round in dharur range of forest divixion. beed | धारुर | 4363606 | 43636 | आदेश दिलेल्या दिनांका पासून 30 दिवसाचे आत. | 1000.00 | शासकिय नियमा प्रमाणे |

उपरोक्त कामाबाबत ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा भरणेची दिनांक, निविदेचा नमुना, निविदेसंबंधी ईतर तपशील खालील प्रमाणे देण्यात आलेला आहे.

कामाची सविस्तर निविदा सुचना व कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून दि.१३.०२.२०२६ रोजी दुपारी १२.०० ते दि.२०.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत भरता येतील.

१. निविदा दि.२३.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता विभागीय वन अधिकारी, बीड वनविभाग यांचे कार्यालय बीड येथे उघडण्यात येतील. निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार विभागीय वन अधिकारी, बीड वन विभाग, बीड यांनी राखुन ठेवला आहे.

२. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार विभागीय वन अधिकारी, बीड वनविभाग, बीड यांनी राखुन ठेवला आहे व त्याचा निर्णय सर्व निविदाधारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.

३. निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३.०२.२०२६ रोजी १२.०० ते दिनांक २०.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पहावयास मिळतील.

स्वा/-
विभागीय वन अधिकारी,
बीड

जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/२५७



## जिल्हाध्यक्ष संजय आंधळेंकडुन माजी खा.प्रितम मुंडेंचा वाढदिवस साजरा

वडवणी :प्रतिनिधी


वडवणी तालुक्यात माजी खा. डॉ. प्रीतम मुंडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. यामध्ये तिगाव व अंतर्गत सहा जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. हा उपक्रम भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आधळे यांच्या वतीने राबविण्यात आला.

बीड जिल्ह्याच्या माजी खा. डॉ. प्रितम गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बॅरनबाजी न करता गरजूंना मदत करण्याचे आव्हान नेहमीच पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे करत असतात, त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करुन माजी खा.डॉ. प्रितम मुंडे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला आहे. यावेळी बोलताना संजय आंधळे म्हणाले की, प्रतिष्ठानच्या व भाजपाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जोपासत विविध सामाजिक उपक्रम राबवले गेले आहेत. यावेळी मच्छिंद्र झाटे, सुखदेव रेडे, ईश्वर तांबडे, बालासाहेब बादाडे, सुभाष आजबे, लक्ष्मण मुंडे, धनराज मुंडे, बालासाहेब शेंडगे, धनंजय शेंडगे, अशोक शेंडगे, सर्जेराव शेंडगे, कल्याण कोकणर, भाऊसाहेब गांडगे, विठ्ठल शिंदे, दत्ता रेडे, मोहन जावळे, अविनाश झोडगे, प्रभाकर मसवले, नभी शेख, जफार शेख आदींची उपस्थिती होती.













हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड – ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३–२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)